# —: प्रेस नोट :—

दिनांक १६/०९/२०१९

फिर्यादी श्री. लालचंद राजमल वानीगोता, वय ६३, धंदा-नोकरी, रा.ठि. दुकान नं. ४, निमकर मार्ग,नागपाडा, मुंबई- ४०००08 हे त्यांचे मालक श्री. जोईतकुमार भोमचंद जैन यांचे रूम नं. १५, पहिला मजला, बिल्डींग नं. २३/२५,२री फोफळवाडी, काळबादेवी, मुंबई- २ या कार्यालयात मागील २२ वर्षापासून काम करीत आहेत. फिर्यादी यांचे मालक श्री. जोईतकुमार भोमचंद्र जैन यांच्या मुंबईत अनेक ठिकाणी बिल्डिंग असून त्यातील रूम पगडी तत्त्वावर लोकांना भाडयाने दिलेल्या आहेत. सदर रूमचे भाडे गोळा करून ते कार्यालयात ठेवणेकामी व त्यानंतर मालकाच्या सांगण्याप्रमाणे ते बँकेत अगर मालकांच्या घरी पोहचविण्याचे काम फिर्यादी व इतर २ कामगार करतात.

दि.१४/०६/२०२१ रोजी १६.४५ वा.चे सुमारास, फिर्यादी हे इतर दोन कामगारांसह त्यांचे मालक श्री. जोईतकुमार जैन यांचे वर नमूद कार्यालयात काम करीत असताना सदर ठिकाणी ४ अनोळखी इसम आले व त्यांनी ते जी.एस.टी. चे अधिकारी असल्याचे सांगून त्यांची चौकशी सुरू केली. तद्नंतर त्यांचे सांगण्याप्रमाणे फिर्यादी व त्यांचे कामगारांनी त्यांचे कार्यालयात उपलब्ध असलेली रोख रक्कम रू.३०,००,०००/- (रूपये तीस लाख ) व हिशोबाच्या वहया टेबलावर काढून दिल्या. सदर रक्कमेबाबत नमूद अनोळखी इसमांनी चौकशी केली तसेच वहयांची तपासणी केली व आपसांत चर्चा करून एकूण रक्कमेपैकी रोख रक्कम रू.११,००,०००/- जमा करीत असल्याचे सांगून सदरची रक्कम त्यांचे सोबत घेवून गेले.

फिर्यादी यांनी सदरची बाब त्यांचे मालक श्री. जोईतकुमार जैन यांना सांगितली असता त्यांनी नमूद अधिकारी हे जी.एस.टी. विभागातीलच होते का ? याबाबत खात्री करण्यास सांगितले. फिर्यादी यांनी सदरबाबत खात्री केली असता जी.एस.टी. विभागाकडून अशाप्रकारची कोणतीही कारवाई झाली नसल्याचे फिर्यादी यांना समजले. तसेच जी.एस.टी.चे अधिकारी हे कोठेही छापा टाकल्यानंतर रक्कम जमा करतेवेळी सील,पंचनामा वगैरेबाबी करतात परंतू अशी कोणतीही बाब नमूद अधिकारी यांनी केलेली नसल्याने फिर्यादी यांची फसवणूक झाल्याची खात्री झाली. तद्नंतर फिर्यादी यांनी त्यांचे मालकाशी संपर्क करून त्यांचे सल्ल्यानुसार दिनांक १५/०१/२०२१ रोजी १९.०० वा. लोकमान्य टिळक मार्ग पोलीस ठाणे येथे येवून फिर्याद दिल्यावरून ४ अनोळखी इसमांविरूध्द गुरक्र. ११७९/२०२१, कलम- १७०,१७१,४१९, ४२०,३४ भादवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयांची माहिती तात्काळ वरिष्ठांना दिल्यानंतर मा. पोलीस सह आयुक्त, कायदा व सुव्यवस्था, मुंबई श्री.विश्वास नांगरे पाटील, मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग श्री. दिलीप सांवत, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२ डॉ.सौरभ त्रिपाठी, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, पायधुनी विभाग श्री.शरद नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू केला. घटनास्थळावरील तसेच आजुबाजुच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासणी केली. प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांकडे चौकशी करून जबाब नोंद केले. राज्य वस्तुकर व विक्रीकर कार्यालय, माझगांव डॉक येथील कार्यालयात वर नमूद घटनेची माहिती दिली असता त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कारवाई त्यांचे कार्यालयाकडून झाली नसल्याचे सांगितले.

वर नमूद गुन्हयातील प्रत्यक्ष साक्षीदार, गोपनीय खबरी व तांत्रिक पुराव्याच्या आधारे कौशल्यपूर्ण तपास करून संशयीत आरोपी नामे यांना पोलीस ठाण्यात आणून सखोल तपास केला असता त्यांचा गुन्हयातील सहभाग निश्चित झाल्याने व त्यांनी गुन्हयाची कबुली दिल्याने त्यांना नमूद गुन्हयात अटक करण्यात येवून त्यांचेकडून नमूद गुन्हयातील अपहारीत रोख रक्कम रू. ११,००,०००/- (अकरा लाख फक्त) हस्तगत करण्यात आली आहे.

तपासादरम्यान गुन्हयातील अटक आरोपी हे राज्य वस्तु व सेवाकर कार्यालय, माझगांव येथे विक्रीकर निरीक्षक असून त्यांनी त्यांचे पदाचा गैरवापर करून कोणत्याही कायदेशीर परवानगी शिवाय फिर्यादी यांना जी.एस.टी. अंतर्गत कारवाई करण्याची भिती दाखवून त्यांचेकडील रोख रक्कम रू.११,००,०००/- गैरमार्गाने स्वतःच्या फायदयाकरीता फसवणूक करून जबरीने घेतल्याचे निष्पन्न झाल्याने सदर गुन्हयात भादवि. कलम - ३८४,३८५ वाढविण्यात आलेले आहे.

मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयांचा पुढील तपास पो.नि. ओम वंगाटे (गुन्हे) हे करीत आहेत.

( दिपक निकम )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
लो.टि. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई.

Scanned with CamScanner